आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता
५ मार्च २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक ही संकल्पना विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- विधानसभेतून समाजवादी पार्टीचे अबु असीम आझमी निलंबित / छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्यांच्या मुद्द्यावरुन दोन्ही सभागृहात गदारोळ

- सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारे ५०० रुपयांच मुद्रांक शुल्क माफ करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना ठोठावलेल्या दोन वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेला नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाची स्थगिती

**आणि**

- ऑस्ट्रेलियाचा फलंदाज स्टीव्ह स्मिथ एकदिवसीय क्रिकेट मधून निवृत्त

**<><><><><>**

रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक ही संकल्पना विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. यंदाच्या अर्थसंकल्पाच्या परिप्रेक्ष्यात रोजगारविषयक बाबींविषयी आयोजित वेबिनारला ते संबोधित करत होते. यंदाच्या अर्थसंकल्पात या संकल्पनेचा प्रभाव दिसत आहे. त्यामुळे हा

अर्थसंकल्प भारताच्या भविष्याची ब्लूप्रिंट आहे. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा आणि उद्योगांप्रमाणेच रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषालाही प्राधान्य दिलं आहे, असं मोदी म्हणाले. क्षमतावाढ आणि प्रतिभेला प्रोत्साहन या दोन्ही बाबी देशाच्या प्रगतीसाठी पायाभरणी करतात. त्यामुळे विकासाच्या पुढच्या टप्प्यात आपल्याला या क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक गरजेची असून त्यासाठी संबंधितांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. रोजगार आणि नवोन्मेष क्षेत्रात गुंतवणूक हा चर्चासत्राचा विषय आहे.

<><><><><>

समाजवादी पार्टीचे आमदार अबु असीम आझमी यांना चालू अधिवेशन संपेपर्यंत सभागृहातून निलंबित करण्यात आलं आहे. औरंगजेबाचं उदात्तीकरण केल्याबद्दल आझमी यांना निलंबित करावं असा प्रस्ताव संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडला. यावर भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी हरकत घेत आझमी यांचं सदस्यत्व विधानसभेच्या पूर्ण कालावधीसाठी रद्द करण्याची मागणी केली. मात्र सदस्यत्व कायमचं रद्द करणं नियमात बसत नसून यासाठी आमदारांची समिती स्थापन केली जाईल असं आश्वासन चंद्रकांत पाटील यांनी दिलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मुनगंटीवार यांच्या मागणीला पाठिंबा दिला,  तसंच छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणाऱ्या सर्वांवर अशीच कारवाई करणार का असा प्रश्न सरकारला विचारला. आझमी यांच्या वक्तव्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान झाला असल्याचा आरोप करत सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी घोषणा दिल्या.

यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा जयघोष सुरू केला. यावर विरोधकांनी आक्रमक होत घोषणाबाजी केली.

अबू आझमी यांचं सदस्यत्व अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत रद्द करण्याचा प्रस्ताव सभागृहात मंजूर झाला.

विधिमंडळ अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधी पक्षांनी सभागृहाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणारे प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर, अबु आझमी यांच्याविरूद्ध आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली.

आदित्य ठाकरे यांनी सांगितलं....

**होल्ड बाईट....**

विधान परिषदेतही अबू आझमी यांनी केलेल्या वक्तव्याच्या मुद्द्यावरुन गदारोळ झाला. कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेसचे भाई जगताप यांनी हा मुद्दा उपस्थित केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आझमी, प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांच्या विरोधात कारवाईची मागणी केली. त्यानंतर दोन्ही बाजूचे सदस्य सभापती यांच्या समोरच्या जागेत घोषणाबाजी करू लागले. त्यामुळे सभापतींनी कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केलं.

**<><><><><>**

राज्यात ओबीसी समाजातल्या विद्यार्थ्यांसाठी घोषित करण्यात आलेल्या ७२ पैकी ५४ वसतिगृह वर्षभरातच कार्यान्वित झाली असून उर्वरित वसतिगृह लवकरच सुरू होतील, अशी माहिती इतर मागासवर्ग

कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आज विधानपरिषदेत दिली. काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला ते उत्तर देत होते.

**जालना** जिल्ह्यात कैलास बोऱ्हाडे या युवकाला मारहाण करणाऱ्यांवर मकोका लावण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत दिलं. याप्रकरणी जालन्याच्या पोलीस अधीक्षकांशी चर्चा करून सर्व गुन्हेगारांना अटक करण्याचे निर्देश दिले आहेत. लवकरच पालकमंत्री तिथे भेट देतील, असं शिंदे म्हणाले.

**<><><><>**

राज्यातल्या विविध सरकारी रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयात भेसळयुक्त औषधांचा पुरवठा केल्याप्रकरणी दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल असं सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांनी लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितलं. मात्र संबंधित दोषी अधिकाऱ्यांचं निलंबन करण्याची आग्रही मागणी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केली. सरकारनं निलंबन करण्याचं आश्वासन न दिल्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकार विरोधात घोषणाबाजी करत सभात्याग केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर झालेल्या भ्रष्टाताराच्या आरोपांचं खंडन करताना मंत्री उदय सामंत यांनी विधानभवन परिसरात सांगितलं.....

**होल्ड बाईट.....**

**<><><><>**

सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारं ५०० रुपयांचं मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय आज राज्य सरकारनं घेतल्याची माहिती

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. या निर्णयाची अंमलबजावणी तातडीनं करण्याचे निर्देश महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रासह शासकीय कार्यालयात दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क यापुढे भरावं लागणार नाही. त्याऐवजी केवळ स्व-साक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्र दिली जातील. या निर्णयाचा फायदा दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांबरोबरच कोट्यवधी नागरिकांनाही होणार आहे.

**<><><><><>**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू शिवाजी कोकाटे यांना ठोठावलेल्या दोन वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेला नाशिक जिल्हा सत्र न्यायालयानं आज स्थगिती दिली. यामुळे माणिकराव कोकाटे यांच्या आमदारकीवरची टांगती तलवार दूर झाली आहे. कोकाटे यांच्या विरोधात दाखल झालेल्या तिन्ही हस्तक्षेप याचिकाही न्यायालयानं फेटाळून लावल्या. सुमारे २० वर्षांपूर्वी खोटी कागदपत्रं देऊन मुख्यमंत्री कोट्यातली सदनिका घेतल्याप्रकरणी कोकाटे बंधूंना न्यायालयानं २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता.

**<><><><><>**

चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत भारतानं ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर क्रिकेट संघातला प्रमुख फलंदाज स्टीव्ह स्मिथ यानं आज एकदिवसीय

क्रिकेट प्रकारातून निवृत्ती जाहीर केली. कसोटी आणि टी-२० क्रिकेट प्रकारात आपण खेळणार असल्याचं स्मिथ यानं सांगितलं.

क्रिकेटमधली वाटचालीत अनेक समाधान आणि आनंद देणाऱ्या आठवणी आहेत. दोन विश्वचषक विजेत्या ऑस्ट्रेलिया संघाचा भाग होणं अभिमानास्पद क्षण असल्याचं स्मिथनं म्हटलं आहे. स्मिथनं १७० एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाचं प्रतिनिधित्व करत  ५ हजार ८०० धावा केल्या आहेत. यामध्ये १२ शतकं आणि ३५ अर्धशतकांचा समावेश आहे. एकदिवसीय प्रकारात स्मिथच्या नावावर २८ बळींची नोंद आहे.

<><><><><>

आयसीसीच्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज लाहोर इथं न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात उपांत्य सामना सुरु आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या ७ षटकात बिनबाद ४४ धावा झाल्या.

//<><><><><>//